।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड उपपरिसर, लातूर

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

**Sub-Campus, Latur**

Ausa road, Peth, Latur - 41353 Maharashtra

Recognized by the UGC U/s 2(f) and 12 (B), NAAC Re-accredited 'B++' Grade

Phone : (02382) 261100
Fax : (02382) 261100

**OFFICE OF THE DIRECTOR**

website : www.srtmun.ac.in
e-mail : directorscl@gmail.com

जा.क्र. स्वारातीमविनां/विउला/२०२३-२४/222 दिनांक : ०४/०८/२०२३

प्रति,
मा.प्राचार्य
सर्व संलग्नित लातूर जिल्हयातील
महाविद्यालये (व्यावसायिक व अव्यावसायिक)
प्रस्तुत विद्यापीठ

विषय: महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेज मध्ये सहभाग घेण्यासाठी सर्व महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी १५ ऑगस्ट २०२३ पुर्वी पोर्टलवर नोंदणी करणे बाबत

संदर्भ: मा. सहा.आयुक्त लातूर यांचे पत्र क्र. जिकौविरोवउमाकेला/म.स्टु.इ. चॅ/१३०३-०५/२०२३, दि.०१.०८.२०२३

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करुन सहकार्य करावे, हि विनंती.

4/8/23

संचालक
विद्यापीठ उपपरिसर, लातूर

संचालक
स्वा.रा.ती.म.वि.
उपपरिसर,पेठ,लातूर

सोबत: उपक्रमाची माहिती

महाराष्ट्र शासन
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,
शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, क्रिडा संकुल समोर, औसा रोड, लातूर-४१३५१२
e-mail : laturrojgar@gmail.com
Webmail- asstdiremp.latur@ese.maharashtra.gov.in
Website : www.mahaswayam.gov.in Phone No 02382-299462

जा.क्र.जिकौविरोवउमाकेला/कौवि/म.स्टु.इ.चॅ/१३०३-०५ /२०२३ दि.०१/०८/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य,
स्वामी रामानंद तिर्थ म. वि. नांदेड
उपकेंद्र पेठ, लातूर

विषय:- "महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज" मध्ये सहभाग घेण्यासाठी सर्व महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी १५ ऑगस्ट २०२३ पुर्वी पोर्टलवर नोंदणी करणेबाबत

संदर्भ:- १.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी मुंबई यांचे पत्र जा.क्र.MSInS/२०२३-२४/C.R.१४६/INS/१३१ दि.२१/०७/२०२३

२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी मुंबई यांचा ई-मेल दि. २७/०७/२०२३

महोदय ,

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने सविनय कळविण्यात येते की, राज्यातील नाविन्यपूर्ण संकल्पना आणि नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत "महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण" जाहीर करण्यात आले. सदर धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी ही नोडल एजन्सी म्हणून कार्यरत आहे. या धोरणाच्या माध्यमातून राज्यामध्ये स्टार्टअप परिसंस्था बळकट करण्याकरिता, इनक्युबेटर्सची स्थापना व विस्तार, गुणवत्ता परीक्षण व बौधिक संपदा हक्कासाठी अर्थसहाय्य, ग्रँड चॅलेंज, स्टार्टअप वीक यांसारख्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

राज्यातील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत "महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज"चे आयोजन करण्यात येत आहे. राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांचा शोध घेणे व त्यांचे नवउद्योजकतेचे स्वप्न साकार करण्यासाठी योग्य ते पाठबळ पुरवणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजचे ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत

- महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी नवउद्योजक व त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचा शोध घेवून त्यांना आवश्यक व्यासपीठ उपलब्ध करुन देणे
- सदर नवउद्योजकांना प्रोत्साहन, तज्ज्ञ मार्गदर्शन, निधी व आवश्यक पाठबळ पुरवणे
- परिणामी राज्यातील नाविन्यपूर्ण परिसंस्था बळकट करणे

वेळापत्रक(प्रस्तावित)

| | |
|---|---|
| **पहिला टप्पा: संस्थांची नोंदणी व संस्थास्तरावर संकल्पनांची निवड** | |
| शैक्षणिक संस्थांची नोंदणी | १५ जुलै ते १५ ऑगस्ट २०२३ |
| विद्यार्थ्यांकडून अर्जासाठी मागणी | ९ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट |
| संस्था स्तरावर सादरीकरण सत्र | १० सप्टेंबर ते २० सप्टेंबर |
| संस्थानिहाय सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २३ सप्टेंबर |
| दुसरा टप्पा | |
| जिल्हास्तरीय १०० सर्वोत्कृष्ट नवसंकल्पनांची घोषणा | २५ सप्टेंबर |
| प्रशिक्षण सत्र | २७ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर |
| जिल्हास्तरावर सादरीकरण सत्राचे आयोजन | ६ ऑक्टोबर- १५ ऑक्टोबर |
| प्रत्येक जिल्हयातून १० विजेत्यांची घोषणा | १८ ऑक्टोबर |
| तिसरा टप्पा | |
| इन्क्युबेशन सहाय्यासाठी मॅपिंग करुन इन्क्युबेशन प्रोग्रामला सुरुवात | १२ महिन्यांसाठी इन्क्युबेशन सहाय्य |
| इन्क्युबेशन प्रोग्राम | |

**शैक्षणिक संस्था व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची जबाबदारी**

- विद्यार्थ्यांमध्ये कार्यक्रमाबद्दल जागरुकता निर्माण करणे
- विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यास प्रवृत्त करणे
- अर्जदाराकडील सादरीकरणाचे मूल्यमापन करण्यासाठी ज्यूरी चे एक पॅनल तयार करणे
- महाविद्यालयीन स्तरावर सादरीकरण सत्र आयोजित करणे आणि जिल्हा प्रशासनाकडे २ संकल्पना पाठवणे

**संकेतस्थळ**

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज बाबत नोंदणीप्रक्रिया व अधिक माहिती महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या अधिकृत संकेतस्थळ www.msins.in व https://schemes.msins.in वर उपलब्ध आहे.

तरी या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आपल्या स्तरावरून सर्व महाविद्यालये/औद्योगिक प्रशिक्षण संस्थाची या उपक्रमासाठी नोंदणी करून संस्थांमधील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागासाठी प्रवृत करावे ही विनंती.

सोबतः- माहिती प्रक्रिया/पत्रक

आपला,

(बा.सु.मरे)
सहायक आयुक्त,
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता
मार्गदर्शन केंद्र, लातूर

**प्रत माहिस्तव सविनय सादर-**
मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर

**प्रत माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर**
१.मा.जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी लातूर

सहायक आयुक्त,
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता
मार्गदर्शन केंद्र, लातूर

# महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज

पार्श्वभूमी:

राज्यातील नाविन्यपूर्ण संकल्पना आणि नवउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत "महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्टअप धोरण २०१८" जाहीर करण्यात आले आहे. सदर धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी ही नोडल एजन्सी म्हणून कार्यरत आहे. सदर धोरणाच्या माध्यमातून राज्यामध्ये स्टार्टअप परिसंस्थेच्या विकासाकरिता पोषक वातावरणनिर्मिती करुन त्यातून यशस्वी नवउद्योजक घडविण्याकरिता इनक्युबेटर्सची स्थापना व विस्तार, गुणवत्ता परीक्षण व स्टार्टअप्सना बौद्धिक मालमत्ता हक्कासाठी अर्थसहाय्य, ग्रँड चॅलेंज, स्टार्टअप वीक यांसारख्या अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

नविन्यता, कल्पकता यांना भौगोलिकतेच्या मर्यादा नसतात, त्या कुठेही यशस्वी होऊ शकतात. नवकल्पनांना योग्य पाठबळ मिळण्याची आवश्यकता असते परंतु योग्य व्यासपीठ व मार्गदर्शनाअभावी चांगल्या कल्पना प्रत्यक्षात उतरू शकत नाहीत. राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी विभागामार्फत महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजचे आयोजन करण्यात येत आहे.

उद्दिष्ट

राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांचा शोध घेणे व त्यांचे नवउद्योजकतेचे स्वप्न साकार करण्यासाठी योग्य ते पाठबळ पुरवणे हे महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजचे मुख्य उद्दिष्ट आहे.

पात्रता:

१. राज्यातील कोणत्याही महाविद्यालय अथवा औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे सध्या शिक्षण घेत असलेले विद्यार्थी /विद्यार्थिनी / जास्तीत जास्त ३ विद्यार्थ्यांचा समूह
२. अर्ज करण्यासाठी विद्यार्थी /विद्यार्थिनी /समूहाकडे नाविन्यपूर्ण संकल्पना असणे आवश्यक आहे

टप्पे

- टप्पा १: संस्थांची नोंदणी व संस्थास्तरावर संकल्पनांची निवड
- टप्पा २: जिल्हास्तरीय सादरीकरण व संकल्पनांची निवड
- टप्पा ३: विशेष इन्क्युबेशन प्रोग्राम

लाभ व पारितोषिके

- जिल्हास्तरावर १० विजेत्यांना प्रत्येकी रु. १ लाखांचे बीज भांडवल
- राज्यस्तरावर १० विजेत्या नवउद्योजकांना प्रत्येकी रु. ५ लाखांचे बीज भांडवल
- विशेष इन्क्युबेशन प्रोग्राम
- इतर योजनांचा लाभ
- शैक्षणिक संस्था आणि जिल्ह्यांना पारितोषिके

टप्पा १: संस्थांची नोंदणी व संस्थास्तरावर संकल्पनांची निवड

- शैक्षणिक संस्थांची नोंदणी
- विद्यार्थ्यांकडून अर्जासाठी मागणी
- संस्था स्तरावर सादरीकरण
- प्रत्येक संस्थेतील सर्वोत्कृष्ट २ संकल्पनांची निवड

टप्पा २: जिल्हास्तरीय सादरीकरण व संकल्पनांची निवड

- प्रत्येक जिल्ह्यातील उत्तम १०० संकल्पनांची सादरीकरणासाठी निवड
- १०० संकल्पनांची प्रशिक्षण कार्यशाळा
- १०० संकल्पनांचे जिल्हा स्तरावर सादरीकरण
- जिल्हास्तरावर सर्वोत्कृष्ट १० विजेत्यांची निवड<br>१० विजेत्यांना १ लाख रुपयांचे बीज भांडवल

टप्पा ३: विशेष इन्क्युबेशन प्रोग्राम

- प्रत्येक जिल्ह्यातील १० अशा एकूण ३६० नवउद्योजकांना १२ महिन्यांचा विशेष इन्क्युबेशन प्रोग्राम
- इन्क्युबेशन प्रोग्राम नंतर ३६० संकल्पनांचे राज्यस्तरीय सादरीकरण
- उत्तम १० विजेत्यांना रु. ५ लाखांचे बीज भांडवल

प्रक्रिया:

१. महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजची घोषणा व बैठकांचे आयोजन (१५ जुलै २०२३)
महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजचा शुभारंभ दि १५ जुलै २०२३ रोजी मंत्री कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता यांच्या हस्ते झाला. सदर उपक्रमाच्या प्रचार प्रसिद्धी व यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांनी २४ जुलै ते २८ जुलै २०२३ दरम्यान आपल्या जिल्ह्यातील सर्व आयटीआय ,महाविद्यालये, विद्यापीठे यांचे प्राचार्य व कुलगुरू यांची VC द्वारे अथवा प्रत्यक्ष बैठक घ्यावी.
सदर बैठकीचे आयोजन जिल्हा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता समितीने करावी. बैठकीची जबाबदारी सहाय्यक आयुक्त रोजगार यांची राहील. सदर बैठकीस सर्व कुलगुरू, प्राचार्य, उच्च व तंत्र तंत्र शिक्षणचे संबंधित विभागीय अधिकारी यांना आमंत्रित करावे. सदर बैठकीमध्ये महात्मा गांधी फेलो/ DSDC यांनी मार्गदर्शक सुचनांचे वाचन करून उपक्रमा संबंधित सर्व नियमावलीविषयी उपस्थितांना अवगत करावे. सदर उपक्रमविषयीची जिल्हास्तरीय प्रचार प्रसिद्धी जिल्हा माहिती अधिकारी यांच्या मार्फत करण्यात यावी.

२. महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची नोंदणी (१५ जुलै ते १५ ऑगस्ट २०२३)
स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजमधे सहभाग घेण्यासाठी राज्यातील सर्व महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजच्या पोर्टलवर (https://schemes.msins.in) विहित काळामध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे. याबाबतचे माहितीपत्रक सोबत जोडण्यात येत आहे.

३. विद्यार्थ्यांकडून अर्जाची मागणी (१ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२३)
सर्व नोंदणी केलेल्या संस्थांमधील विद्यार्थ्यांना स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजच्या पोर्टलवर (https://schemes.msins.in) अर्ज करता येईल.

४. संस्थात्मक स्तरावर सादरीकरण आणि छाननी (१० सप्टेंबर ते २० सप्टेंबर २०२३)
प्रत्येक शैक्षणिक संस्था सहभागी उमेदवारांसाठी सादरीकरण सत्र आयोजित करेल. या सत्रामध्ये जूरी म्हणून संबंधित शैक्षणिक संस्थेतील उद्योजकता विषय पाहणारे शिक्षक/प्राध्यापक काम करतील अथवा संस्थेने निर्देशित केलेली व्यक्ती काम पाहील. स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजच्या पोर्टलवर (https://schemes.msins.in) मूल्यांकन निकष संस्थांना दिलेले असून, सदर पोर्टलवर प्राप्त अर्जांचे मूल्यांकन शैक्षणीक संस्थेमार्फत करण्यात येईल. या साठी प्रत्येक शैक्षणिक संस्थेला log In ID व पासवर्ड महाराष्ट्रअ राज्य नाविन्यता सोसायटीद्वारे पुरवला जाईल.

५. शैक्षणिक संस्था स्तरावर उत्कृष्ट २ संकल्पनांची निवड (२३ सप्टेंबर २०२३)
शैक्षणिक संस्था स्तरावरील सादरीकरण सत्रानंतर प्रत्येक संस्थेतील सर्वोत्तम २ संकल्पनांची निवड करण्यात येईल. ही निवड विद्यार्थ्यांना मिळालेल्या गुणांच्या आधारे करण्यात येईल.

६. प्रत्येक जिल्ह्यात सर्वोत्कृष्ट १०० नवसंकल्पनांची निवड (२५ सप्टेंबर २०२३)
जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्थांकडून प्राप्त झालेल्या सर्वोत्तम २ संकल्पनांमधून, सर्वोत्कृष्ट १०० संकल्पनांची जिल्हास्तरीय सादरीकरणासाठी निवड करण्यात येईल.

७. प्रशिक्षण कार्यशाळा (२७ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०२३)
निवडलेल्या १०० नवउद्योजकांसाठी, स्टार्टअप प्रवासाच्या मूलभूत गोष्टींबद्दल माहिती आणि सादरीकरण कसे करावे याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी, १ दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. या कार्यशाळेविषयीची माहिती निवडक विद्यार्थ्यांना SMS अथवा ईमेलद्वारे देण्यात येईल.

८. जिल्हास्तरावर सादरीकरण सत्र (६ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर २०२३)

प्रत्येक जिल्हास्तरावर निवडलेल्या १०० नवउद्योजकांना सादरीकरणाची संधी दिली जाईल. सहभागींचे मूल्यांकन करण्यासाठी प्रत्येक जिल्हा विविध ज्युरी पॅनेल तयार करेल व स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजच्या पोर्टलवर (https://schemes.msins.in) सदर मूल्यांकन करण्यात येईल.

९. जिल्हास्तरावर सर्वोत्कृष्ट १० विजेत्यांची निवड (१८ ऑक्टोबर २०२३)

प्रत्येक जिल्ह्यातील सादरीकरण सत्रातून १० विजेते निवडले जातील. यामधे ३०% महिला व ५०% विजेते हे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून असतील. १० विजेत्यांमधे One District One Product (ODOP) संबंधित नवसंकल्पना असल्यास २ विजेत्यांना प्राधान्य देण्यात येईल. प्रत्येक विजेत्याला रु. १ लाख बीज भांडवल मिळेल.

१०. विशेष इन्क्युबेशन प्रोग्राम:

प्रत्येक जिल्ह्यातील १० अश्या एकूण ३६० नवउद्योजकांना १२ महिन्यांचा विशेष इन्क्युबेशन प्रोग्राम.

११. इन्क्युबेशन प्रोग्राम नंतर ३६० संकल्पनांचे राज्यस्तरीय सादरीकरण करण्यात येईल व सर्वोत्कृष्ट १० नवउद्योजकांना प्रत्येकी रु. ५ लाखांचे बीज भांडवल देण्यात येईल.

Maharashtra
State Innovation
Society

महाराष्ट्र शासन

# कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी

# महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज

राज्यातील विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठीचा उपक्रम

**ATTENTION!**

**<u>महाविद्यालये व आय.टी.आय</u>**

**आपल्या संस्थेतील नवउद्योजकांच्या स्वप्नांना पाठबळ देण्यासाठी आपण इच्छुक आहात का?**

**जर तुमचं उत्तर होय असेल तर ही संधी तुमच्यासाठी आहे...!**

आजच
आपला सहभाग
निश्चित करा



अंतिम दिनांक
**१५ ऑगस्ट २०२३**

**"ध्यास प्रगतशील महाराष्ट्राचा
विद्यार्थी नवउद्योजक घडवण्याचा"**

**अधिक माहितीसाठी www.msins.in ला भेट द्या किंवा QR स्कॅन करा**

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन

### महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी

Maharashtra State Innovation Society

# महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज

राज्यातील विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा उपक्रम

टप्पा १ : महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची नोंदणी - दि. १५ जुलै ते १५ ऑगस्ट २०२३

टप्पा २ : विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पांनाची नोंदणी - दि. १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२३

टप्पा ३ : प्रत्येक जिल्ह्यात सर्वोत्कृष्ट १०० नवसंकल्पनांचे सादरीकरण

टप्पा ४ : प्रत्येक जिल्हास्तरावर सर्वोत्कृष्ट १० विजेत्यांची निवड - प्रत्येक विजेत्यांस रु. १ लाखांचे बक्षिस



राज्यातील सर्व महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी आजच आपला सहभाग नोंदवावा

अधिक माहितीसाठी www.msins.in ला भेट द्या किंवा QR स्कॅन करा

**ध्यास प्रगतशील महाराष्ट्राचा, विद्यार्थी नवउद्योजक घडवण्याचा**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी

Maharashtra
State Innovation
Society

# महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज

राज्यातील विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा उपक्रम




**ध्यास प्रगतशील महाराष्ट्राचा, विद्यार्थी नवउद्योजक घडवण्याचा**

# महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज

## उद्दिष्ट

- राज्यातील महाविद्यालयीन व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांचा शोध घेणे
- नवउद्योजकतेचे स्वप्न साकार करण्यासाठी योग्य ते पाठबळ पुरविणे

## पात्रता:

१) राज्यातील कोणत्याही महाविद्यालय अथवा औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे सध्या शिक्षण घे असलेले विद्यार्थी /विद्यार्थिनी / जास्तीत जास्त ३ विद्यार्थ्यांचा समूह

२) विद्यार्थी /विद्यार्थिनी /समूहाकडे नावीन्यपूर्ण संकल्पना असणे आवश्यक आहे

# महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज

टप्पे :

१) महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची नोंदणी - दि. १५ जुलै ते १५ ऑगस्ट २०२३

२) विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पांनाची नोंदणी - दि. १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२३

३) प्रत्येक तालुक्यात नवसंकल्पनांचे सादरीकरण व सर्वोत्कृष्ट ३ नवसंकल्पनांची निवड (प्रस्तावित)

४) प्रत्येक जिल्ह्यात सर्वोत्कृष्ट १०० नवसंकल्पनांचे सादरीकरण

५) प्रत्येक जिल्हास्तरावर सर्वोत्कृष्ट १० विजेत्यांची निवड - प्रत्येक विजेत्यांस रु. १ लाखांचे बक्षिस

# महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज

## लाभ व पारितोषिके

- तालुकास्तरावर ३ विजेत्यांना पारितोषिके (*)
- जिल्हास्तरावर १० विजेत्यांना प्रत्येकी रु. १ लाखांचे बीज भांडवल
- राज्यस्तरावर १० विजेत्या नवउद्योजकांना प्रत्येकी रु. ५ लाखांचे बीज भांडवल
- विशेष इन्क्युबेशन प्रोग्राम
- इतर योजनांचा लाभ
- शैक्षणिक संस्था आणि जिल्ह्यांना पारितोषिके

# महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज

## अपेक्षित सहकार्य

१. Press Conference, शैक्षणिक संस्था व इतर भागीदारांशी बैठक

२. जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्थांची व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची या उपक्रमासाठी नोंदणी

३. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागासाठी प्रवृत करणे.

४. या उपक्रमाचे आयोजन व यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या सूचना देणे

महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज

# संकेतस्थळ

www.msins.in

https://schemes.msins.in